

सद्‌गुरुनाथ श्री बाबाजीमहाराज पंडितांचे

आत्मचरित्र

(अभंग - २२४)

.....

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

(१)

कासयाची चिंता । आठवितां भगवंता ॥१॥
आटताती भेदभाव । प्रे स्मरतां वासुदेव ॥२॥
नाहीं विकारासी थारा भोगमोक्षावरी चिरा ॥३॥
ज्ञानेशजासुत म्हणे । **प्रेमीं रंगोनी पाहणें ॥४॥**

(२)

देहींच वसोनी कामादि विकार । लुटिती तस्कर मजलागीं ॥१॥
काय नारायणा म्हणावे ययासी । तुझिया ब्रीदासी न शोभे हें ॥२॥
मनाचा मवाळू आयिकीलें कानीं । प्रतीति निर्वाणीं नाहीं मज ॥३॥
ज्ञानेश्वरकन्ये उघडी लोचन ।
आपुला जाणोन सांभाळी कां ॥४॥

(३)
मनीं इच्छा भारी गावे तुझे गुण । म्हणोनी कवन आरंभिले ।।१।।
तुझिया कृपेनें अक्षर मेळणी । साधे तेणें गुणीं गात होतो ।।२।।
शब्दार्थाची चोरी माझें कांहीं नाहीं । परी गर्वे ठायीं झकविलों ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये अंतरीं जाणोनी । केली मानहानि पराहातीं ।।४।।
(४)
काय नाहीं झाली अपराधांची क्षमा । तरी मेघःश्यामा धांवसी ना ।।१।।
दया उणी जरी म्हणूं भगवंतीं । ऐकिली ती कीर्ति व्यर्थ काय ।।२।।
चुकलों म्हणता सर्व पापधुनी । ऐसे संतजनीं कथियेले ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये पतित मी खरा । परी नाहीं थारा तुजविण ।।४।।
(५)
चुकलों म्हणोंनी तैसेचि करीता । कोठवरी ताता क्षमा करा ।।१।।
परी काय करुं लागलें व्यसन । विषया अधीन मन सदा ।।२।।
तीव्र दंड देतां चुकेल अपाय । एरवी उपाय नसे दुजा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये दंडाची याचना । करोनिया मना नाणसी कां ।।४।।
(६)
कोवळीया मना अति तीव्र दंड । वाटे अवघड कळों आलें ।।१।।
परी यमराव दिधल्यावांचोनी । सोडील जननी केविं मज ।।२।।
नावडेचि परी करणें दंडन । तरी प्रेमदान पाठवावे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये दोहोंतुनि एक । करावा सम्यक उपाय त्वां ।।४।।
(७)
सांगोनियां निज साक्षीस्वरूपासी । मौन स्वीकारिसी इये काजीं ।।१।।
तरी मग कोण मजसी सांगाती । पुढें यमपथीं रक्षावया ।।२।।
याचनेनुसार देताऽनुमोदन । तुझे साक्षीपण भंगेना कीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये मग कां उशीर ।
धरवेना धीर मज कांहीं ।।४।।
(८)
कवणिया रीति पुरवूं याचना । जरी तुझें मना संकट हें ।।१।।
तरी मायबापा सांगतों उपाव । दोन्हीहि सावेव साधे जेणें ।।२।।
देहीं द्यावा दंड चित्तीं सुवा प्रेम ।
मुखीं तुझें नाम राहो सदा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये इतुके करिता । अपाय तत्त्वतां चुकेल कीं ।।४।।
(९)
रोगें व्यापिताचि काया पापफळ । भोगील्या जाईल संपूर्ण ते ।।१।।
तेणें यमजाच चुकेल सर्वथा । विषयासक्तता उरे मग ।।२।।
तुझिया प्रेमानें चित्त अळुमाळ । होता रसव्याळ बाधेचिना ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये निवारी सांकडें । घेई माते कडे उचलोनी ।।४।।
(१०)

एक नारायण स्मरतांचि वाचे । तुटताती कांचे यमाजीचे ।।१।।
वाचे जडतांचि हरिनाम चाळा ।
हृदय झोपाळा हरि डोले ।।२।।
मन ठायीं जिरे वाचे पडे मौन ।
सर्वाठायीं कृष्ण भासो लागे ।।३।।
एक ज्ञानेश्वर-कन्यापादरज । लाधतां सहज कार्यसिद्धि ।।४।।
(११)
अनादिसंसारीं सोडविता प्राणी । सज्जनावांचोनि कोणी नाहीं ।।१।।
संतांचें संगतीं राहोनी कष्टला ।
ऐसा न देखिला पुरा कोणी ।।२।।
गालवानुग्रहें साऱ्या कृष्णस्त्रिया । वैकुंठराणिवा योग्य झाल्या ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये दिधलिया हाता । मग भवचिंता कासयाची ।।४।।
(१२)
सकल वियोगीं संतचि तारक । न होती मारक कोणे काळीं ।।१।।
संतापराधीं संतद्वारा देव । रक्षितो सावेव निजदासा ।।२।।
देवरोषीं जातां संतासीं शरण । रिघतां मरण चुके बापा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पदरीं घेऊनी । उपेक्षा निर्वाणीं न करीच ।।४।।
(१३)
सकलही देव जयाचे आधीन ।
कल्याणनिधान स्वामी माझा ।।१।।
तयासी सांडोनि देवता यजन । वेदासी प्रमाण नाहीं नाहीं ।।२।।
यज्ञो वै विष्णुः- ऐसी श्रुति गर्जे । एका केशवराजें सकल काम ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या **ध्यातां प्रेमभरें ।**
आघवाचि पुरे मनोरथ ।।४।।
(१४)
कोण भरंवसा तुझिये मानसीं । कांरे न चिंतीसी नारायणा ।।१।।
किती रे शिणसी कामिनीच्या योगें । काळ तुझ्या मागें उभा असे ।।२।।
कोण रे येतील तुझिया सांगातीं । नरकविपत्ति भोगावया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या चरणा वांचूनि ।
आधार अवनीं नाहीं दुजा ।।४।।
(१५)
कायरे नायकसी संताच्या वचना । मानिसी भाषणा कामिनीच्या ।।१।।
आतां वाटे गोड पुढें अवघड । स्वामी यमदंउ साहवेना ।।२।।
काय जाब देसी विचारितां यम । कारे मेघःश्याम नाठविला ।।३।।
एक वार घेतां ज्ञानेशजा नाम ।
पवित्र परम कुळ त्याचे ।।४।।

(१६)
संसारसागरीं बुडतिया जीवा । नसे दुजी नावा नामाविण ।।१।।
येथें नको काहीं तप आटाआटी । नामाची कासोटी धरलिया ।।२।।
सकल पातका होतसे बोहरी । रामकृष्णहरी स्मरणेंचि ।।३।।
कलियुगीं ज्ञानेशजानामाविण ।
साधनें तीं अन्य दोषयुक्त ।।४।।
(१७)
योगादि साधनें इतर युगींची । कलींत ती साची अवघड ।।१।।
न राहेचि कधीं निर्विषयस्थिति । क्षणांत उठती नाना काम ।।२।।
न साधेल योग न साधेल तप । एक नामजप साध्य येथें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये ऐसे जाणोनिया । प्रगटवि इया साधनातें ।।४।।
(१८) हेंचिरे करावें
जन्मा येऊनियां हेंचिरे करावें । वाचे आळवावें कृष्णनाथा ।।१।।
जन्मा येऊनियां हेंचिरे करावें । चरण वंदावें सज्जनांचे ।।२।।
जन्मा येऊनियां हेंचिरे करावें । देह झिजवावें परहितीं ।।३।।
जन्मा येऊनियां हेंचिरे करावें । ज्ञानेशजे गावें आवडीनें ।।४।।
(१९)
कासया याचना करितोसीं जना ।
भवविमोचना सांडोनियां ।।१।।
कां रे शिणविसी आपुली ही वाणी । जनांच्या स्तवनीं वाउगीच ।।
कारे वांकविसी मस्तक धनीका । कां न दीनसखा आळविसी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या कृपाळु सांडोनि । व्यर्थ होणें श्रमी जनामागें ।।४।।
(२०)
जळो ब्रह्मज्ञान जळो कुळशीळ । जंव घननीळ वाचे नये ।।१।।
हरिप्रेमाविण ज्ञानाची गरीमा । आगमां निगमां मान्य नाहीं ।।२।।
प्रेमें वाचे गाये रामकृष्णहरी । सांडोनियां सारी जनलज्जा ।।३।।
ज्ञानेशनंदिनीचरणपंकजा ।
प्रेमजळीं ओजा अभिषेकी ।।४।
(२१)
कासया करिसी एवढा साटोप । नानापरी पाप आचरोनी ।।१।।
देहअस्थिमोळी काळाचिये हातीं । न कळे निगुती पडेल कैं ।।२।।
एकटेचि जावें लागेल रे अंतीं ।
न येती मागुती कोणी तुझ्या ।।३।।
जाणोनि अंतरीं सावध गबाळा । ज्ञानेश्वरबाळा चित्तीं ध्यायी ।।४।।
(२२)
कां हो मोकलिता मजसी दातारा । आलों कष्टें दारापाशीं तुझ्या ।।१।।
कोणतें संचित फळले म्हणोनी । दिसले लोचनीं पाय तुझे ।।२।।
परी ते दुर्दैवें अंतरले आजी । सांगा गोविंदजी काय करूं ।।३।।

ज्ञानेशजासुता तुम्हाविण हरी । कोण पुतनारी सांभाळील ।।४।।
(२३)
पाय पाहण्याची मनामाजीं हौस । साधनीं आळस कैसे होय ।।१।।
सदगुणाच्या बळें आकळीन तुज । म्हणतांचि लाज वाटे मनीं ।।२।।
पुण्य संपताचि येऊनिया पाहे । पुढें उभा राहे पापगिरी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सर्वापरी हीन । दयेसी होईन पात्र केविं ।।४।।
(२४)
झालियाचि क्षमा करोनिया देवा । निज प्रेम ठेवा द्यावा मज ।।१।।
तुझिया दासांचा घडो नित्य संग । इतर तो पांग निवटावा ।।२।।
मग काळें तरी होतां शुद्धचित्त । दयेनें धांवत याल तुम्ही ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये कवणेही परी । असे सूत्रदोरी तुझे हातीं ।।४।।
(२५)
कासया रे मना धरिसी आवडी ।
बंधुपुत्रगोडी वाढविसी ।।१।।
आठवी तें एक सुंदर चरण । गोपिकारमण दीनबंधु ।।२।।
जितुकी कां वाटे विषयांत गोडी ।
तितुकी सावडी हरिनामीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याचरणचिंतनीं । चित्त ब्रह्मपणीं पैठे होय ।।४।।

०००

माझी कथा

(२६) आत्मनिवेदन
काय पूर्वपुण्य होते म्हणोनियां । लाधलीसे काया ब्रह्मवंशीं ।।१।।
परी पूर्वपाप ओढवले तेथ । जाहलों पतित कर्मत्यागें ।।२।।
षोडशवरुषावधि न ठाऊक । गायत्री सम्यक मज लागीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या सर्व निवेदीन । कैशापरी हीन आहे तो मी ।।४।।
(२७)
बाळपणीं माये दुर्जनसंगती । प्राप्त मजप्रति पूर्वपापें ।।१।।
तेणें आचरलों अनंत पातकें । मुख्य तीं तीं निकें परिसावी ।।२।।
संग्रहीत धन नेतसे चोरोनी । आवडे घेऊनि खात असो ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये देवोनिया दंड । वारिला उदंड यमजाच ।।४।।
(२८)
पुढें परघरीं करोनियां चोरी । पुरवी नानापरी निज कोड ।।१।।
मातेसी बोलिलों नाना अपशब्द । खाई मतिमंद चोरोनिया ।।२।।
माझ्या शाठ्यधाकें न बोलेंचि कोणी । पिता लेखी मनीं काळासम ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सादर श्रवणीं । ऐके वो जननी माझी कथा ।।४।।
(२९)
ऐके दिनीं पिता घेऊनियां मला । तुझी नाममाला उपदेशी ।।१।।

जपताचि वाणी तुझी नामावळी । पालटो लागली वृत्ति तेव्हां ।।२।।
पुढें तुझे पायीं जडो लागे मति । सख्या विश्वपति मायबापा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सेवा संपादिली । तेणें झाली होळी पूर्वपापा ।।४।।
(३०)
अनुसूयाबाळीं बडिला आवडी । मज परवडी तेचि सांगे ।।१।।
जडला विश्वास आत्रेयाच्या पायीं । मनीं कामनाहि धरोनियां ।।२।।
करी पारायणें गुरूचरित्राची । इष्ट कामनेची पूर्ति व्हाया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये कोणीहि भुकेला । स्मरता तुजला न राहेचि ।।४।।
(३१)
तिये ग्रंथीं असे वर्णिला विशेष । भुजगविभूष उमापति ।।१।।
आणि तैसाचि तो कैवल्याचा दाता । ब्रह्मादि परता गुरूराणा ।।२।।
ऐकुनि श्रवणीं याचिया प्रभावा । धरुनि प्रेमभावा पुजी शिव ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सर्व तुझे गुण । वेदादिपुराण गाती माये ।।४।।
(३२)
मनीं वाटे भारी केधवां सदगुरू । भवबंधहारू पाहीन मी ।।१।।
वाहोनियां नित्य पाहायाची आशा । सज्जनवळसा धुंडी सदा ।।२।।
परी दुष्ट मन न बैसेचि कोठें । सेवित गोमटें पाय तुझें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये संसारी भ्रमतां । मनीं दासचिंता वाहसी तूं ।।४।।
(३३)
सकामभक्तासी न चुकेचि कर्म । प्रारब्ध परम अज्ञा जेविं ।।१।।
जोवरी सकाम तोवरी तो भिन्न । त्याचे कर्मधन त्यासि देसी ।।२।।
निष्काम होऊनि तुजसी अभिन्न । होतां कर्मधन कोण भोगी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये पूर्णकामा तुज । कर्मफळीं काज काय असे ।।४।।
(३४)
तुजसी मिळोनि भिन्नत्वीं राहतां । वाटतसे चित्ता लाज तुझ्या ।।१।।
म्हणोनियां भक्त नोहे कदा भिन्न । उपाय करण लागे तुज ।।२।।
तैचि त्याचे हृदीं तुझियापासोनी । वाहे मंदाकिनी प्रेमगंगा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तुझ्या प्रेमोदयीं । आटती सर्वही भेददुःख ।।४।।
(३५)
कधीं न दे दुःख आपुलिया भक्ता ।
प्रतिज्ञा ही ताता तुमची कीं ।।१।।
परी जों न होय तुजसी अभिन्न । तंव भोग क्षीण नोहे कदा ।।२।।
पातला दुष्काळ खाया नसे अन्न । महाकष्टें प्राण वांचविले ।।३।।
ज्ञानेशजे कांहीं होती तुझी दया । वाचलो पहाया पाय तुझे ।।४।।

(३६)
मायबापें कष्ट सोसूनिया फार । रक्षिले निर्धार आम्हां लागीं ।।१।।
होतां भरंवसा मुलेंहि वांचता । नुरे दरिद्रता आमुचीहि ।।२।।

कष्टें वेंचुनियां द्रव्य आम्हालागीं । विद्याभ्यासालागीं करविले ।।३।।
ज्ञानेशजे कष्ट न गणुनी त्यांचे । दुःखानळीं साचे टाकिले त्या ।।४।।
(३७)
कांहीं दिन अंगीकारिली श्ववृत्ति । द्रव्यहि निगुती मेळविले ।।१।।
मातापितयातें वाटला हरीख । वाटे अत्रिसुत वळलासे ।।२।।
परी पूर्वकर्म ओढवले भारी । ऐका पूतनारी तेहि सांगो ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या याचि समयास । मेघ वळलास चातकासी ।।४।।
(३८)
कांहीं काळ करोनियां द्रव्यार्जन । पुनः विद्यार्जन आरंभिले ।।१।।
संग तो मिळाला कर्मत्यागियाचा । मीहि मार्ग साचा आदरिला ।।२।।
न करी क्षणही तुझिये स्मरण । विषयीच मग होऊनि ठेलो ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये भ्रष्ट ऐशापरी । असोनिहि करी धरिलेस ।।४।।
(३९)
दत्तउपासना फळली मजसी । सदगुरुपदासी देऊनिया ।।१।।
स्वामी दत्तात्रय अत्रीचा नंदन । करीत विंदान मायबाप ।।२।।
मित्राचिया रूपें येऊनि बोधिलें । भाग्य उदयिले तुझे बापा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या आली इये पुरीं । आतां देहपुरीं नको दृष्टी ।।४।।
(४०)
आनंद मानसीं उताविळ जीव । केव्हां गुरुराव पाहीन दृष्टीं ।।१।।
स्वामी दत्तात्रयें घेऊनिया सवें । नेलें प्रेमभावें संतगृहीं ।।२।।
संताचे संगतीं होता चित्तशुद्धि । मनोरथ सिद्धि तात्काळचि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या देखिली लोचनीं ।
फिटलीं पारणीं इंद्रियांचीं ।।४।।
(४१)
जंव तुझी कृपा नोहेचि दयाळा । तों इंद्रियलळा निवटेना ।।१।।
तंव न भेटती कोणी तुझे दास । न पैठे मानस पायीं तुझ्या ।।२।।
लाधलिया संतचरणाची धूळ । सदगुरू दयाळ समीपचि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तुझिया दासांचा । महिमा तो साचा कोण वर्णी ।।४।।
(४२)
स्वामीं दत्तात्रयें दाखवितां डोळा । देखिले दयाळा निद्रिस्थचि ।।१।।
सच्चिदानंदबोध झालियाहिवरी । तळमळ उरी जैसी तैसी ।।२।।
आयिकीलें कानीं तें रूप लोचनीं । पाहूं प्रेमगुणीं ऐसे वाटे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या तीव्र चित्तावेश । करीतसे मीषें निद्रेचिया ।।४।।
(४३)
कृमिरोगीं बाळा जेविं कां जननी । अपाय जाणोनी नेदी गोड ।।१।।
तैसे संत तेहि जाणोनी अपाय । सकामासी ठाय न देतीच ।।२।।
कामनेच्या आशे सकाम निष्काम । संतसमागम इच्छिताती ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या निष्कामाचे घरीं ।

राबे सर्वोपरी त्याच्या हिता ।।४।।
(४४)
असो कां सकाम परी हो अनन्य । साधु अनुगुण कृपा करी ।।१।।
घडी एका सेवी घडी वंदी दुज्या । समर्पित पूजा नाना देवा ।।२।।
न बैसेचि कोठें घडीभरी स्थिर । सदा परनार सेवू इच्छी ।।३।।
स्कंददासप्रभु ऐसिया पामरा ।
नेदी पदीं थारा कोणे काळीं ।।४।।
(४५)
असो नारायणीं एकचि आवड । पुरवावी चाड अनन्याची ।।१।।
स्वयें भगवान वदले गीतेंत । अनन्याचे हित मीचि पाहे ।।२।।
असो पहावया ऐकांतिक भक्त । ठेले भगवंत निद्रिस्थ तै ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या दीनसहाकारी । जागीं सर्वापरी दासहिता ।।४।।
(४६)
पातलों दर्शना प्रदोषसमयीं । कळो आले आई निद्रिस्थ कीं ।।१।।
ऐकिलें श्रवणी जन्मांध असोनी ।
सर्वशास्त्रयोनि दिसतसे ।।२।।
कोमल उमर तेजःपुंज काया ।
मानी कृष्णजाया आपणातें ।।३।।
स्कंददासमाता निद्रचिया मिषें ।
भेटावया पिसें चित्त करी ।।४।।
(४७)
सर्वही नगरीं जना श्रुत झालें । महाराज आले म्हणोनिया ।।१।।
दर्शन घ्यावया लोकांचे ते थवे । नित्य येती नवे दिन राती ।।२।।
दिसाया सरोष मनीं तळमळ । कधीं हे चांडाळ वळतील ।।३।।
स्कंददासप्रभु कोमल हृदयीं । पहावेना बाई जनदुःख ।।४।।
(४८)
निवारिता करी आपुलाचि हठ । बुझावी थापट देवोनिया ।।१।।
तिये मातेवरी कोणता चांडाळ । आरोप करील दुष्ट म्हूण ।।२।।
तेविं संताठायीं दिसताहि क्रोध ।
होय अपराध दोष देता ।।३।।
स्कंददासप्रभु पूर्ण आप्तकाम । असोनि सकाम जनहिता ।।४।।
(४९)
जनाचिया भेटीं आम्हां होतो त्रास । म्हणोनि शिव्यास वोपीतसे ।।१।।
जनाची ऐसीच दिसतसे रीती ।
कोपी विसरती उपकारा ।।२।।
बाळपणाहूनि प्रेमानें पाळीत ।
तिये लाथाळीत कांतेसाठीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यामाया विमोहित । न जाणती हित पामर ते ।।४।।

(५०)
बाळपणीं मळमूत्रपूयपंकीं । जननीच्या कुीं पचताती ।।१।।
तारुण्यांत येतां कामिनीच्या हिता । अनेकांच्या लाथा साहतसे ।।२।।
वृद्धपणीं सर्व त्यागिती बांधव । मरण सावेव इच्छिताती ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यासंगती लाधतां ।
संसार तत्त्वतां ब्रह्ममय ।।४।।
(५१)
कोण असे ऐसा दाता त्रिभुवनीं । माझिया जननी वांचोनिया ।।१।।
विसरोनी तिचे एवढे वात्सल्य । म्हणती न योग्य कोप संतीं ।।२।।
असो ऐशारीति वोपताचि शिष्या । म्हणती कासया साधु झाला ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या अज्ञानी जाणोनी । सहात निर्वाणी बोल त्यांचे ।।४।।
(५२)
संकल्पे जगता सृजी पाळी नाशी । लोकांचे ते सोशी अपशब्द ।।१।।
स्वयें आत्माराम अखंडित सुखी । दासांचिया दुःखीं कासावीस ।।२।।
स्वरूपीं नसोनी गमनागमन । ज्याचे पर्यटण जनहिता ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सखे मायबाई ।
उणा तुझें ठायीं खरा कोप ।।४।।
(५३)
असो तये दिनीं दीनांचा दयाळ । मध्यरात्री वेळ पाहोनियां ।।१।।
सावध होऊनी पाचारी शिष्यासी । म्हणे रे स्नानासी पाणी काढी ।।२।।
दर्शनाच्या आशे तिष्ठत बैसलों । तेधवां लाधलों पादरज ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यावचन पेशल । ऐकतां निवालं चित्त ठायीं ।।४।।
(५४)
स्वामीं दत्तात्रेया आधीं परिचय । एकरूप होय म्हणोनियां ।।१।।
आम्हा अज्ञदृष्टीं भासतसे भेद । तो अत्रिवरद ब्रह्मरूप ।।२।।
नसे तये ठायीं अज्ञानसंबंध । जहाले द्विविध जगकाया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या आत्माभेदपणीं । दत्तात्रेय म्हूणी संबोधित ।।४।।
(५५)
स्नान करोनियां समर्पिली पूजा । सख्या ज्ञानराजा आळंदीशा ।।१।।
तैसाचि पूजिला यशोदानंदन । कामारिवंदन दीनबंधु ।।२।।
अवतारकृत्य संपादावयाते ।
उपदेश तातें आरंभिला ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याचित्त हळुवार । प्रेम अनिवार लोटला तैं ।।४।।
(५६)
स्तन्याचिया आशे बाळक रिघता । पदरा आतौता घेत माय ।।१।।
स्तन्यामृतपानें पुत्र होतां पुष्ट । लावतील दृष्ट म्हणोनियां ।।२।।
सकामसंगतीं वेदान्तचिंतन ।
वाढवील पूर्ण विषयाशा ।।३।।

मग ब्रह्मानंदपुष्टि न मिळेल ।
चित्त झळंबेल भोगामाजीं ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या याचि एका अर्थी । सांगती जाहली वेदगूज ।।५।।
(५७)
विद्या वय रूप मंजुळ भाषण । मोहियलें मन इहीं गुणीं ।।१।।
बोबडिया बोलीं बोलें जें बालक । तया प्रौढभाख केविं कळे ।।२।।
तेविं न जाणतां शब्दार्थ कुसरी । आनंदसागरीं मग झालों ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या सर्वांसी समान । नाहीं थोर सान तिये ठायीं ।।४।।
(५८)
लाचावलें मन सांन्निध्य कराया । कधीं देवराया ठाव देसी ।।१।।
इये विधि नित्य वाहतसे चिंता । मनीं गुरूनाथा आठवीत ।।२।।
कांहीं दिनवरी झालिया संगती । गुरुराजमूर्ति दुरावले ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या भक्तांचियासाठीं । दुःखचिया कोटी सोशितसे ।।४।।
(५९)
पावले लिखीत नाना अत्यासन्न । गुंतलेसें मन पायीं तुझ्या ।।१।।
वाचोनी लिखित निघाले तांतडी । नाहीं परवडी भोजनाची ।।२।।
धांवोनिया आला सखा गुरुराणा । पाहताचि मना समाधान ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याकृपें दिसेंदिस । स्वास्थ्य प्रकृतीस नानाचिया ।।४।।
(६०)
सर्वही भावने आश्रय श्रीहरी । सर्वांचीहि उरी पुरविता ।।१।।
जो जो ज्या ज्या भावें लेखितो तयासी ।
देव त्या बुद्धीसी दृढ करी ।।२।।
प्राक्तनीय भावा संकल्पें दृढता । होताचि तत्त्वतां जीव बद्ध ।।३।।
ज्ञानेशजाकान्त सर्वाभूतीं सम । पुरवितां काम इच्छिला जो ।।४।।
(६१)
संकल्प झालिया प/रवश जीव । दुज्या जन्मीं हांव तीच धरी ।।१।।
अनादिकालाचा पतिपत्निभाव । श्रीकृष्णीं सावेव जडलासे ।।२।।
हेंचि दावावया बाल्याचिपासोनी । सौभाग्यादि चिन्हीं अलंकृत ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या श्रीकृष्णीं मिळोनी । चिन्हसंपादनीं जनहिता ।।४।।
(६२)
प्राप्ताहि पुरुषा उरलेसे कर्म । लोकालागीं धर्म निवेदावा ।।१।।
स्वभावप्रवृत्ति दिसतसे जनीं । वडिलामागोनी जाती लोक ।।२।।
पतिपत्निभक्ति संप्रदाय पूर्ण । कात्यायन्यर्चन आरंभिले ।।३।।
ज्ञानेशजा गंगा श्रीकृष्ण उदधी । मिळे नदनदी घेऊनिया ।।४।।
(६३)
निरोप तो आला स्वामी दत्तात्रया । अवश्यचि कीं या उत्सवातें ।।१।।
कळो आलें मज अत्रिसूतमनीं । ज्ञानेशनंदिनीं पदीं वाहूं ।।२।।
म्हणोनियां मज घेवोनि सांगाती । निघे गुरुमूर्ति पायापाशीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्यासूत भाग्योदय । तैंचि दत्तात्रेय कृपा करी ।।४।।
(६४)
प्रारब्धकर्माचें भोगिताहि फळ ।
सखा घननीळ उपेक्षीना ।।१।।
तेथेहि देवोनि दासांची संगती । पोषितसे वृत्ति प्रेमबद्ध ।।२।।
स्वामी दत्तासवें आलो अमरावती । हरिदिनीं होती तये दिनीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यीं ठेविलिया भाव ।
उपेक्षेसी ठाव नाहीं नाहीं ।।४।।
(६५)
आधीं हरिदिनी वरी संतसंग । त्यांत सानुराग गुरुचर्या ।।१।।
त्रिवेणीसंगमीं करितां मज्जन । पातकें संपूर्ण दग्ध झाली ।।२।।
ऐका कोण कोण होते संतजन । निघाले दर्शन घ्यावया जे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याचरणीं अर्पण । तनमनधन केलें जिहीं ।।४।।
(६६)
द्वापारीं गोपिका विरहसंतप्त । तया संबोधित ब्रह्मज्ञान ।।१।।
करूणाचे घरीं शांता पाहुणेर । विरोधी साचार व्यवहारू ।।२।।
एका आवडतो सगुण साकार । दुज्या निराकार ब्रह्मसत्ता ।।३।।
ज्ञानेशजाकान्ते केले अनुचित । वाटोनी उचित दंड घेई ।।४।।

(६७)
म्हणे मी ययांच्या विरहा डागणीं । वेदान्त बोधुनी दिधला कीं ।।१।।
जाणली न त्यांची प्रेमवशवृत्ति । उपकारा मिती नाहीं ज्यांच्या ।।२।।
कोणेपरी होय ययाचे क्षालन । निष्कामा लागून काय द्यावें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या कान्ता म्हणे आतां । उपाय तत्त्वतां शोधूं कांहीं ।।४।।
(६८)
करोनियां त्यांची नित्य पादसेवा । होऊं प्रेमभावा उतराई ।।१।।
बोधोनियां तया उगें ब्रह्मज्ञान । दिधले दारूण विरहदुःख ।।२।।
तरी आपणहि भोगावा विरह । क्षालन तैं होय पाप तेणें ।।३।।
स्कंददासप्रभु विचारी मानसीं । रूपें गोपिकासी कोण्या भजूं ।।४।।
(६९)
या तों रूपें नोहे सेवा गोपिकांची । माझे ठायीं त्यांची पति बुद्धि ।।१।।
गोपिका-लहरी-लागीं मी सागर ।
विरह साचार केविं होय ।।२।।
व्हावे माता तरी कन्येचा वियोग । पतिग्रहयोग होता राहे ।।३।।
म्हणोनियां आतां तरंग होऊन । सेवा संपादीन सविरह ।।४।।
स्कंददासप्रभु म्हणे गोपीसूत । व्हावें हेंचि युक्त दिसे माते ।।५।।

(७०)
स्वरूपविस्मृति नाहीं हें दावाया । वासुदेव ठाया न सोडीच ।।१।।
कार्यरूप नाहीं माझा हा विग्रह । दावितसे भाव मूळपदें ।।२।।
कोण होय दशा गोपिका प्रेमळा । अनुभवकळा दावितसे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यासूत होवोनिया । राहे येवोनिया शेषपुरीं ।।४।।

(७१)
टिटवीचें लक्ष जैसें पिल्यापाशीं । गुरूपाशीं तैसी वृत्ति ज्याची ।।१।।
कधीं माहेरुनी येईल निरोप । हाचि एक जप चित्तीं जया ।।२।।
उत्सवनिमित्त लिखित पावतां । निघती तत्त्वतां आम्हासवें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याचरणाची गोडी । मेल्याहि न सोडी जयालागीं ।।४।।
(७२)
उमास्तन्यामृतें ब्रह्मानंदीं लीन । भासे जग जाण अंबारूप ।।१।।
सर्व विघ्नदुःखें कृपें लया जाती । म्हणोनी बोलती गणपती ।।२।।
सर्व कार्यारंभीं करिती पूजन । व्हावया निर्विघ्न कार्यसिद्धि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या आम्हा गणपति । रक्षो दिनराती कृपाबळें ।।४।।
(७३)
सकाम जनासी थोर विघ्नभीति । सदा आठविती गजास्यातें ।।१।।
सदा हरिदास निर्भयचि पोटीं । सोशी हरिसाठीं कोटी दुःखें ।।२।।
दुःखचि दे तया सर्व सुखफळ । दुःखे तळमळ हरिपायीं ।।३।।
ज्ञानेशजासूत म्हणोनी वांछिती । येवोत विपत्ति आम्हां लागीं ।।४।।
(७४)
ऐसा पाहोनियां भक्तमहिमान । गजास्य वंदोन पुसे माते ।।१।।
कैसा या भक्तांचा हरिपायीं भाव । इच्छिती सदैव दुःख अंबे ।।२।।
उमा वदे बाळा जावोनिया पाहे । वाचे न बोलवे माझियाते ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या एकचि ते जाणे । कैसा प्रेमगुणें हरि वश ।।४।।
(७५)
तेथे जावोनिया पायीं ठेवी भाळ । होई तिचा बाळ प्रेम घ्याया ।।१।।
ऐसे ऐकोनियां मातेचें वचन । निघे गजानन तेथोनियां ।।२।।
मूळरूप अंतर्धान करोनियां । घेत दुजी काया मूळ नामें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पायीं लोटांगणी । घालोनी चरण सेवो लागे ।।४।।

(७६) संयोगात वियोगातील ओढ कायम
संयोगाचें सुख भोगिलियावरी ।
भोक्ता होता तरी उणें सुख ।।१।।
म्हणोनी संयोगीं वियोगानुभवे ।

लागे ते रक्षावे परप्रेम ।।२।।
याचि एक्या गुणें शेषपुरीं पाहे । येऊनियां राहे गणपती ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यालिखित पावतां । व्रतार्थ निघता झाले तेही ।।४।।
(७७)
पूर्ण ब्रह्म हरी घेई अवतार । आपुलें ऐश्वर्य न सोडितां ।।१।।
ब्रह्मादिक देव परी सर्वाठायीं । परिमित पाही ऐश्वर्य ते ।।२।।
वैकुंठाधिपति सखा नारायण । निरतिशय पूर्ण भोग तेथें ।।३।।
ज्ञानेशजासूत म्हणे त्याची कळा । अकळ सकळा ब्रह्मादिकां ।।४।।
(७८)
पूर्णकाम जिहीं सखा केला हरी । परी न अंतरीं भोग काम ।।१।।
अनंत ब्रह्मांडें क्षणें घडी मोडी । षडभग न सोडी जया कदा ।।२।।
ऐसा मी समर्थ माझे तंव भक्त । नेच्छिती किंचित ऐश्वर्य ते ।।३।।
ज्ञानेशजाप्रभु विस्मित मानसीं । दास-वैराग्यासी पाहोनियां ।।४।।
(७९)
आप्तकाम हरी नाहीं भोग आशा । नाहीं जगदीशा भोक्तेपण ।।१।।
भक्त जे जे अर्पी देवाचिये पायीं । लीले शेषशायी भोक्ता होय ।।२।।
सर्वही सामर्थ्य असतां ब्रह्मानंद । परी नेणें पद भक्तांचे ते ।।३।।
ज्ञानेशजाप्रभु म्हणे धन्य भक्त ।
विरागी डुलत ब्रह्मानंदें ।।४।।
(८०)
देवाचिया सुखें स्वयें सुखी होती ।
ऐसी भक्तप्रीति अनिर्वाच्य ।।१।।
षडभगसंपत्ति सांडोनियां देती । अविरल रति हरिपायीं ।।२।।
पायिकाचें सुख नेणवे आणिका । स्वयें व्हावें देखा तेव्हां कळे ।।३।।
स्कंददासप्रभु ज्ञानेशजे पायीं । श्रीनिवास बाई होऊनि आला ।।४।।
(८१)
शेषपुरीहूनि आम्ही चौघेजण । पावली येऊन अमरावती ।।१।।
श्रीनिवासभेटी झाली तये स्थानीं । होती हरिदिनी ते दिवशीं ।।२।।
अवघे मिळोनि तेथोनी निघालो । आनंदें पातलों पायस्विनी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या चरणदर्शनीं । जाहली आटणी तिन्ही तापा ।।४।।
(८२)
पुढें संतीं मज मणिकर्णिका । नेऊनियां पायीं समर्पिलें ।।१।।
सकल गोपींचा कृष्णीं पतिभाव । परी नाहीं ठाव मत्सरासी ।।२।।
पाहोनिया ऐसें विमल अंतर । आली महीवर भागीरथी ।।३।।
म्हणे याचि गुणें ज्ञानेशजाकान्त । वश गोपीप्रत ऐसे वाटे ।।४।।
(८३)
मही येऊनिया विचारी मानसीं । कैसे या गुणासी संपादावे ।।१।।
गोपीपादसेवा केलियावांचोनी । नातुडे साधनीं कोणत्याही ।।२।।

तंव महीवरी ऐकियेलें कानीं । पुरुष वेशानीं गोपी आली ।।३।।
वेगें येऊनियां ज्ञानेशजेपायीं । मणिकर्णिका आई मिठी घाली ।।४।।
(८४)
स्वयें वासुदेवें स्वीकारिलें दास्य । वाटे जो उपास्य गंगाधरा ।।१।।
उपास्य करीत ज्याची पादसेवा । तेंचि उमाधवा बळें प्राप्त ।।२।।
जाणोनियां भाव धरी अवतार । ओळख साचार नाममात्रें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पायीं तैं उघड्या । प्रेमळांच्या उड्या पडो लागे ।।४।।
(८५)
रामावतारीं संपादिली सेवा । एकनिष्ठभावा धरोनियां ।।१।।
पाहोनिया भाव कथी आत्मज्ञान । वैदेहीरमण तयालागीं ।।२।।
आत्मारामाहातीं घोटवीन लाळ । ऐसा नाहीं खेळ तियेठायीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या कांतचि एकटा । चित्ताचा चोरटा ज्ञानियांच्या ।।४।।
(८६)
मर्यादा भक्त्यंग जानकीजीवनीं । रत्यंग श्रीकृष्णीं होत असे ।।१।।
चतुर्दशवर्षें करोनियां कष्ट । राघवा संतुष्ट केले जेणें ।।२।।
परी लाधावया गोपीकांतीं रति । पाहिजे संमति गोपिकांची ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याकृपा जैं लाहिजे । तरीच पाविजे इया सुखा ।।४।।
(८७)
संयोगीं वियोग हाचि परप्रेम । बोलिले सुगम सुरमुनि ।।१।।
परी गोपी कृपेवांचोनि निश्चिती । नोहेचि ही स्थिति प्राप्त कोणा ।।२।।
हाचि एक हेत धरोनिया मनीं । सेवी दासपणीं लक्ष्मुमण ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या तनमनधन । शेखी आत्मार्पण करी जो कां ।।४।।
(८८)
असंगवृत्तीचा येवोनि कंटाळा । भक्तीचा सोहळा भोगूं इच्छी ।।१।।
असोनि असंग अहंब्रह्मजप । व्यर्थ खटाटोप असे माझा ।।२।।
नसे माझ्याठायीं अविद्यासंपर्क । सर्वभूतीं देख केवल मी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यासुता मनीं वाटे । अहंब्रह्म माटे बंधनचि ।।४।।
(८९)
कृष्णावतारीं हरि संकर्षण । तया श्रेष्ठपण देत देवो ।।१।।
कालियामर्दन करावया जळीं । उडी वनमाळी घेतलीसे ।।२।।
सर्व गोपगोपी गायी आक्रंदती । गेला विश्वपति म्हणोनिया ।।३।।
ज्ञानेशजाकान्त निघे जलांतून । हांसे संकर्षण पाहोनियां ।।४।।

(९०)
तेधवां कळलें श्रीकृष्णालागून । म्हणे ज्ञानाभिमान यासी असे ।।१।।
पुढें पाठवूनी तयास व्रजांत । गोपीप्रेमरीत दाखविली ।।२।।
पाहोनियां प्रेम भावितसे मनीं । गोपिकाचरणीं निवटावे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या द्वापारीं गोपिका । संकर्षण निका हरि झाला ।।४।।
(९१)
शेषगिरीवरी जावोनि राहिला । उद्धरी जनाला हेळामात्रें ।।१।।
एक नारायण भक्तीचा भुकेला । कर्मधर्म त्याला कांहीं नको ।।२।।
परी लोकहिता धर्माचें पालन । दावी आचरोन अज्ञजना ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या गुह्य न जाणतां । आचारीं तत्त्वतां भुलताती ।।४।।
(९२) धर्माचे पालन
निष्कामकर्मानें होत चित्तशुद्धि । कृष्णीं प्रेमवृद्धि तत्प्रसादें ।।१।।
विहित सेवणें निषिद्ध त्यागणें ।
शमदम येणें सुखसाध्य ।।२।।
सर्वथाचि त्याग सर्वथा सेवन ।
नये हातीं मन कोणे काळीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या याचिलागीं म्हणे । धर्मे तोषविणें कृष्णनाथा ।।४।।
(९३)
यापरी पाहतां धर्म भक्ति-अंग । परी तत्त्व चांग उमजेना ।।१।।
हरिप्रेमामाजीं धर्म येतां आड । त्यागावा तत्त्वता सर्वथा तो ।।२।।
व्यंकटरमणा वाटलें वोंगळ । पाहतां धर्मबळ प्रेमाहूनि ।।३।।
सांडोनिया गिरी निघे व्यंकटेश । ज्ञानेश्वरकन्येस पहावया ।।४।।
(९४)
पाहतांचि पाय जडलें मानस । मग गिरिवास नावडेचि ।।१।।
गोपिकांचे रूप धरुनि शंकर । करीत विहार गोपीसंगें ।।२।।
पाहोनियां उमा विचारी एकान्तीं । कोठे प्राणपति जात असा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या सखी तेव्हां बोले । भोगितो सावळे कृष्णब्रह्म ।।४।।
(९५)

साश्चर्य पार्वती बोलत प्रियासी । कवण्या विधीस हरिप्राप्त ।।१।।
गोपिकाचरणीं होता प्रिये लीन । घेतो उचलोन कृष्ण कडे ।।२।।
ऐकोनियां उमा चालली शोधित । म्हणे गोपीपद दिसती कै ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या श्रीकृष्णकामिनी । ऐकोनियां जनीं दर्शन घे ।।४।।
अ(९६)
दिठीं पाहतांचि सुकुमार पाया । करितसे काया निंबलोण ।।१।।
होतां पायीं एक चित्त समर्पण । स्वरूपीं रंगोन ठेली तेव्हां ।।२।।
आदिशक्ति माया त्रैलोक्य जननी । मूर्त प्रेमखाणी अवतरली ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या प्रेमासी भुलोनी । मानीत जननी तिजलागीं ।।४।।
(९७)
द्वापरीं उद्धव पाही गोपीप्रेमा । म्हणे धन्यतमा ह्याचि एक ।।१।।
यांची पादसेवा करितां निश्चिती । वियोग श्रीपति होईल ना ।।२।।
याची एक्या-भावें होवोनियां भक्त । अखंड करीत प्रेमें सेवा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पाहोनिया भक्ति । भक्त हेचि देती नांव तया ।।४।।
(९८)
द्वापारीं श्रीकृष्णें मांडियेला रास । फिका ब्रह्मरस करोनियां ।।१।।
ते दिनापासोनि सर्व सुर ऋषी । श्रीकृष्णरतीसी वांछितातु ।।२।।
परी कृष्णप्रियादास्य केल्याविण । मनोरथ पूर्ण न होती कीं ।।३।।
ऐसे जाणोनियां ज्ञानेश्वरसूता । सेवाया तत्त्वता जन्म घेती ।।४।।
(९९)
ऐसिया संतांचें वंदोनी चरण । पयस्विनी स्नान सारिलें तैं ।।१।।
पयोरूप जिचा प्रवाह तत्वतां । भासे अज्ञचित्ता जलरूप ।।२।।
सज्ञान अज्ञान असो कां बालक । माता दोघा देख सम लेखी ।।३।।
तैसी पयस्वीनी माय सर्वांवरी । समानचि करी अनुग्रहो ।।४।।
ज्ञानेश्वरकन्ये मांडिला उत्सव । पवित्र हा ठाव पाहोनियां ।।५।।
(१००)
व्रताची सांगता कराया लागून । होय यजमान गुरुरावो ।।१।।
पाचारोनी सदा भूसुर कार्यार्थ । मंत्र क्रिया अर्थ जाणते जे ।।२।।
यथासांग सर्व करोनियां कर्म । करिती अर्पण कृष्णपायीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या श्रीकृष्णीं पावोनी । करी संपादनी जनशिक्षे ।।४।।

(१०१)
संकल्पानुसार श्रीकृष्णें वचन । देतां संतर्पण करीतसे ।।१।।
चारी दिनवरी भोगिला सोहळा । न जाय वर्णिला वाचेनें जो ।।२।।
असो पूर्वपापें पातला समय । आवश्यक होय जाणें ग्रामीं ।।३।।
अधित विद्येची द्यावया परीक्षा । गुरू सर्वाध्यक्षा अंतरलों ।।४।।
अत्रिसूत तेव्हां विचारिती स्वयें । ज्ञानेशजे माये येतो आतां ।।५।।
(१०२)

निरोप मिळतां निघालो तेथोनी । आपुलिया ग्रामीं जावयाते ।।१।।
शेषपुरीं रोगें मांडिलेसे ठाण । नाहीं तया भेण गेलों तेथें ।।२।।
हुरहुर चित्तीं अंतरले पाय । न वाटेचि ठाय गोड कोणी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यापाय आठवोनी । रडे रातदिनीं मुळमूळ ।।४।।
(१०३)
स्वामी दत्तात्रया सुचेनि कांहीं । भिरभिर पाही मायेकडे ।।१।।
म्हणती चलावे माझिया ग्रामासी । सुखसंगतीशीं कांहीं दिन ।।२।।
मानवले चित्ता राहे कांहीं दिन । परी समाधान चित्तीं नाहीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पाहो वाटे डोळा । दृष्टीचा सोहळा संताचिया ।।४।।
(१०४)
कर्मधर्म कांहीं न वाटेचि गोड । रात्रंदिन चाड माहेराची ।।१।।
स्नान करावया जावे नदीतीरीं । लटिकीची करी मातृलीला ।।२।।
स्वामी दत्तासवें घालाच्या फुगड्या । काळवेळ घड्या न गणोनी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यापायाचिया लोभें । नावडती उभे विषयहि ।।४।।
(१०५)
हरिपाठवृत्ति स्वामी आरंभीती । आळंदिभूपति प्रियोद्देशें ।।१।।
शेवटीये दिनी ब्राह्मणाचें रूप । घेवोनिया बाप पातला तैं ।।२।।
म्हणती आम्हासीं घालावें भोजन । क्षुधित म्हणून आलो येथें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यासूत पाहावया । आळंदीच्या राया आवडती ।।४।।
(१०६)
षोडश वरूषी गौरवर्णमूर्ति । नाहीं देहवृत्ति ऐसे वाटे ।।१।।
कटीं एक वस्त्र नासाग्र ती दृष्टि । नसेचि चिंधोटी आंगावरी ।।२।।
शीतकाळ परी वस्त्रविरहित । शिखा उपवीत शोभतसे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या द्वंद्वविरहित । सुखदुःखमात तेथें कैंची ।।४।।
(१०७)
ऐकोनी भाषण स्वामी दत्तात्रय । पाचारिती स्वयें भोजनासी ।।१।।
पाहुनी स्वरूपा मानसीं विस्मय । असे माझी माय पोटीं वाटे ।।२।।
सिद्ध झाला पाक बैसलों भोजना । आळंदीचा राणा सांगातेचि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या भावाची भुकेली ।
तृप्त होय जळीं प्रेमें दिल्या ।।४।।
(१०८)
कोण मी बैसलों कवणिया काजीं । नसे वृत्तिमाजीं जयाचिया ।।१।।
काय वाढलेसे मिष्टान्न कदान्न । नाहीं त्याचें भान ब्रह्मरूपें ।।२।।
भाव पाहोनियां दिधला ढेकर । तृप्त मी साचार दाखवाया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या बाप तेचि लेक । द्वैतमिसें एक मिरविती ।।४।।
(१०९)
भोजन झालिया दिधला तांबूल । म्हणती आम्हाला निरोप द्या ।।१।।
स्वामी दत्तात्रय लागती चरणा । बोलत प्रयाणा करा सुखें ।।२।।

बोळवाया गेले नदीतीरावरी । नवलाची परी जाहलीसे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या तात कृपामूर्ति । अदृश्य ते होती देखतचि ।।४।।
(११०)
पाहोनियां मनीं वाटलें नवल । हो आळंदीपालकन्या वाटे ।।१।।
सखेदाश्चर्य जाहलेमानस । वाटत आम्हास ठकविले ।।२।।
परी मायबापें दिले दरूशन । वाटे समाधान हेंचि एक ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये पटविली साक्ष । जाहल्या प्रत्यक्ष भेटी पुढें ।।४।।
(१११)
ऐसा काळ गेला स्वामी दत्तासंगें । इतर प्रसंगें राहवोनी ।।१।।
नाहीं विद्याभ्यास इतर कारण । महाराज वर्णन मुखीं सदा ।।२।।
तेथूनियां पुढें आलों सोमपुरीं । मायबाप घरी भेटावया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये वाचे आळवीत । होतो कंटाळित काल तेथें ।।४।।
(११२)
वाटे पुनः केव्हां पाहीन चरण । तुटेल बंधन केव्हां माझें ।।१।।
वाटे कांहीं कळो माहेराची मात । धाडावें लिखित मायबापे ।।२।।
सुखी आहे बाळा न करी खेदासी । येईन भेटीसी तुझ्या सख्या ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या मातृवचनाची । आवड ती साची मनीं बहू ।।४।।
(११३)
कांहीं मोहराची कळावी खबर । ऐसी हुरहुर चित्तीं सदा ।।१।।
म्हणोनी धाडिलें लिहोनि लिखीत । स्वामी कार्यरत भाऊलागीं ।।२।।
कवणिये गांवीं माझे मायबाप । कुशल निरोप नसे ठावा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये करा आठवण । पतित मी पूर्ण तुझे द्वारीं ।।४।।
(११४)
वियोग संतप्त तुमचे लिखित । संजीवनी होत दीनबंधो ।।१।।
असे माय सुखी इतुकें वचन । वाटे समाधान ऐकोनियां ।।२।।
तुम्ही संतीं माझा केल्या अंगीकार । दीनांचा दातार वळेल जी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या तुमचिया बोलें । म्हणेल तान्हुले मजलागीं ।।४।।
(११५)
संताचें हृदय लोण्याहूनि मऊ । पाठवित भाऊ लिखित तैं ।।१।।
श्रीगुरूमाउली गेलीसे माहेरीं । माये ज्ञानेश्वरा भेटावया ।।२।।
तेथूनियां आतां हरदा मुक्कामीं । नांदे सुखधामीं विदित हो ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या सुखी सर्वांपरी । न करी अंतरीं चिंता कांहीं ।।४।।
(११६)
ऐसा एक मास लोटलियावरी । गेलो शेषपुरीं परीक्षेते ।।१।।
देऊनी परीक्षा आलो पुनः ग्रामीं । विवाह संभ्रमीं मातापिता ।।२।।
द्रव्यार्जनें आम्हां करील अनृण । म्हणोनियां ऋण तिहीं केलें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तुज नाहीं बोल । माझें कर्मफळ मज देता ।।४।।
(११७)

कांहीं दिन सोमपुरींच राहोन । कंठी काळ जाण वियोगांत ।।१।।
कवण्या सुदैवा नावडेल पाय । जे कां मूळ होय सर्वसुखा ।।२।।
धन्य तेचि जन जिहीं चित्तवित । केले समर्पित मायबापा ।।३।।
ज्ञानेशजासुता दिवाळी दसरा । भेटता सोयरा ऐसा कोणी ।।४।।
(११८)
पूर्वपुण्यें ऐसा भेटला सोयरा । जेणें दिला चिरा विषयसुखीं ।।१।।
कृष्णप्राप्तिलागीं एकचि उपाय । गोपिकांचे पाय शास्त्र सांगे ।।२।।
म्हणोनियां नाना रूपें घेऊनियां । गोपिकांच्या पायां सेवूं प्रेमें ।।३।।
हेचि धरुनियां मानसीं कामना । वाटे शिव जाणा रूप धरी ।।४।।
माझ्या मायबापा शंकरावांचोनी । कोण करी ऋणी ज्ञानेशजा ।।५।।
(११९)
जयाचे तपाचा नेणवेचि पार । वर्जोनि आहार चिंती हरी ।।१।।
आठही प्रहर हरिनामाविण । नेणें भूकतहान निद्राहि ते ।।२।।
जळाविण मीन तैसा तळमळी । विकारांची होळी करूनियां ।।३।।
ज्ञानेशजाप्रेमें विसरला सर्व । देहादिकभाव आविद्यक ।।४।।
(१२०)
राहे कैलासशिखरीं । उमा माता अंकावरी ।।१।।
तोचि आला महीवरी । राजेश्वर नामधारी ।।२।।
पिता येऊनियां सांगे । राजेश्वर भेटी मागे ।।३।।
ज्ञानेशजासूत पायीं । जाऊनिया ठेवि डोई ।।४।।
ंए

(१२१)
पुसे मधुरवचनें । कोठोनियां झाले येणें ।।१।।
निवेदिले महाराजा । गेलो होतो व्रतकाजा ।।२।।
माय पयोष्णीचे तीरीं । स्वामी माझा व्रत करी ।।३।।
ज्ञानेशजा माय माझी । कृष्ण होऊनि कृष्ण यजी ।।४।।
(१२२)
इतुकें वचन पडतांचि कानीं । निघाले तेथोनी मायभेटीं ।।१।।
मार्गीं संतभेटी घेतचि ते भले । स्वामीपाशीं आले दर्शनेच्छे ।।२।।
पाहोनिया प्रेम भक्तीचा जिव्हाळा । म्हणे गोपीबाळा सत्यचि हे ।।३।।
तनमनधन अर्पोनियां पायीं । सेवेलागीं राही तिजपाशीं ।।४।।
(१२३)
होतांचि विवाह द्रव्यार्जनीं चित्त । जाहले आसक्त अनायासें ।।१।।
सोमपुरीं राजसेवा संपादिली । मायेची निमाली आठवण ।।२।।
कांही काळवरी केली राजसेवा । मिळाला सुदैवा अर्धचंद्र ।।३।।
ज्ञानेशजापाय पाहणें दैवांत । आलों अकस्मात शेषपुरीं ।।४।।

(१२४)
विषयाचा त्याग अति अवघड ।
परमार्थ गोड कडू झाला ।।१।।
किती नाडियेले विषयांचे संगें । नाना मुनिदांगे मिती नाहीं ।।२।।
ज्ञानी म्हणवोनी इंद्रिये लाळिता ।
झकवित चित्ता तयांच्याहि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणे माझे व्हारे ।
मग भय नुरे तिळमात्र ।।४।।
(१२५)
जंववरी नोहे कामिनीदर्शन ।
तंववरी जाण गुरुदेव ।।१।।
अस्थिमांसगोळा पाहोनी भुलतो । पाय विसरतो श्रीगुरूचे ।।२।।
हृदयकल्हारीं पहुडोनी तिसी । स्वयें होय दासी निलाजरा ।।३।।
ज्ञानेशजासुत नेणें हिताहित । कामें व्याप्त चित्त म्हणोनियां ।।४।।
(१२६)
जंव जंव वाढे विषयाचा संग । तंव राधारंग दुरावत ।।१।।
निज माहेराची विसरलों वाट । वासना अचाट द्रव्यार्जनीं ।।२।।
शेषपुरीं राजदास्य स्वीकारिले । माता पिता धाले पाहोनियां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पाय विसरोनी । चित्त द्रव्यार्जनीं सक्त झाले ।।४।।
(१२७)
कांहीं दिन दत्तसंगती सोडोनी । राहे अन्यस्थानीं शेषपुरीं ।।१।।
तेणें अंतरता सज्जन संगती । जडली आसक्ति भोगामाजीं ।।२।।
पुढें दैवयोगें आली पूर्वस्थिति । लाधली संगती तयाचीच ।।३।।
ज्ञानेशजामाय न सोडीच कर ।
केल्या अंगीकार एकवेळ ।।४।।
(१२८)
पातला समय उघडले दैव । मायबापा कीव आली माझी ।।१।।
मार्गशीर्षमास कात्यायन्युत्सव । निघाले सावेव सर्वजण ।।२।।
विश्वपति कृष्णा मानलिया पति । आपणा निगुती मातृपद ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यामाता दर्शनासी । चालले वेगेसी सर्वजण ।।४।।
(१२९)
कात्यायन्यर्चन उत्सव सोहळा । पहावया डोळा आवड ती ।।१।।
स्वामी दत्तात्रये जाणुनी अंतरीं । घेत बरोबरी निज दासा ।।२।।
वाठोडा मुक्कामीं येऊनी पाहिला । मायबाप डोळा प्रेमभरें ।।३।।
ज्ञानेशजासुतें सर्व संतापायीं । प्रेमभरें डोई समर्पिली ।।४।।
(१३०)
चोहों दिशेहून यात्रा ती लोटली । वंदिती माउली प्रेमभावें ।।१।।
वनीं हिंडतांचि चुकले पाडस । जीव कासाविस हरिणीचा ।।२।।

चारा आणावया रानांत पक्षिणी । पिलियांची मनीं चिंता वाहे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पुत्रांचिया भेटीं । तळमळ पोटीं करी बहू ।।४।।
(१३१)
मातेचिया दृष्टीं नसे सानथोर । करूणा साचार पाठीं पोटीं ।।१।।
परि पुत्रकाजा दावि विषमता । चित्तांत समता वागवोनी ।।२।।
कोणावरी प्रेम कोणावरी राग । चित्तीं अनुराग सर्वांचाचि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या याचि एका पाडे । वागत रोकडें निज पुत्रीं ।।४।।
(१३२)
कवणा बोलावी पत्रिका प्रेषून । कोणा पाचारण इच्छामात्रें ।।१।।
पाहोनी मातेचे भावावरी प्रेम । संपादावा प्रेम आपणहि ।।२।।
ऐसेचि वाटावे उनाड पुत्रासी । तरी लिखितासी न धाडी त्या ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या प्रेमबद्ध झाला । तया लिखितासा पाठवीत ।।४।।
(१३३)
पयस्विनी तटीं ऐसा संतमेळा । पहाया सोहळा लोटलासे ।।१।।
भक्तिसुख घ्याया ब्रह्मीचें प्रस्थान । करिती सज्जन आत्मचर्चा ।।२।।
आत्मचर्चेमाजीं गुरुमुखांतूनि । भक्ति मंदाकिनी वाहतसे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यासंगें ऐशापरी । सगुण श्रीहरीमय सर्व ।।४।।
(१३४)
व्रताची सांगता झालियाहि वरी । प्रेमें स्वयें करी नाना लीला ।।१।।
जयापरी होता श्रीकृष्णसंयोग । भोगिला वियोग गोपिकांनीं ।।२।।
विरहसंतप्तें तादात्म्य पावुनी । श्रीकृष्णकरणी आरंभिती ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या वियोग कल्पुनी । तादात्म्य पावोनी करी लीला ।।४।।
(१३५)
पयोष्णिपुलिनीं सर्वा समवेत । खेळे आनंदात रासलीला ।।१।।
करिती आनंदे सुस्वर गायन । राधिकारमण म्हणोनिया ।।२।।
जलांत बुडोनी मनोहर गीत । करिता भासत वेणुरव ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या करी नाना लीला । गोपीप्रेमकळा दावावया ।।४।।
(१३६)
ज्या ज्या भावें हरी क्रीडला गोपीशीं । त्या त्याचि भावासी दावितसे ।।१।।
विरहतादात्म्ये होऊनियां कृष्ण । म्हणे स्तनपान देई मज ।।२।।
देई माते मज आणोनियां चांदु । देई शब्दनादू खेळावया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या यशोदानंदन । कृष्ण बाळपण दावितसे ।।४।।
(१३७)
कधीं होऊनियां गोपिकासुंदरी । गाऱ्हाणें ती करी यशोदेसी ।।१।।
खातो नवनीत आमुचे चोरोनी । माखतसे लोणी मुखीं माझ्या ।।२।।
बळेंचि चुंबन घेवोनिया जातो काम चेतवितो मानसींचा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणत यशोदे । विसरलो छंदें याच्या सर्व ।।४।।
(१३८)

कधीं आयकोनी यशोदाबंधन । म्हणत गाऱ्हाण उगें केले ।।१।।
गृहीं आसोनियां न खायेचि लोणी । आमुचे सदनीं चोरी करी ।।२।।
कोणता उपाय करुं बाई आतां । घरीं कृष्णनाथा आणावया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या यशोदेसी क्षमा । मागुनियां श्यामा आणूं इच्छी ।।४।।
(१३९)
केव्हां भावोनियां अक्रूरागमन । विनवी दारूण तयालागीं ।।१।।
म्हणत अक्रूरा कोणी तुझें नाम । अविचारें जाण ठेविलेसे ।।२।।
आम्हासी लोटोनी विरहसागरीं । नेसी पूतनारी मथुरेते ।।३।।
ज्ञानेशजा म्हणे आम्हासी वधोनी । जावो मोक्षदानी सुखें मग ।।४।।

उद्धव-गोपी संवाद

४०)
ऐकोनी निरोप उद्धवाचे हातीं । म्हणत श्रीपति भेटवी कां ।।१।।
जावोनियां सांग निजब्रह्मज्ञान । आलासी शिकोन जेथोनियां ।।२।।
पावोनिहि ऐक्य म्हणसी मी ब्रह्म । येरा काय नाम ठेवितोसी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणत उद्धवा । कृष्णमुख दावा आम्हालागीं ।।४।।
(१४१)
ऐकोनी वचन उद्धव बोलत । व्यापक सर्वत्र परब्रह्म ।।१।।
नसे तयेठायीं आकारप्रतीति । सांडावी हे भ्रान्ति वाऊगीच ।।२।।
मज तुम्हामाजी सारखा व्यापुनी । राहे चक्रपाणि समरस ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या ऐकताचि बोल । ब्रह्मज्ञान फोल म्हणे तंव ।।४।।
(१४२)
म्हणत उद्धवा आम्हा ऐसे भासे । गुरुकृपा नसे तुजवरी ।।१।।
म्हणोनिया तुज न सांगेचि गुज । सखा यदुराज नित्य जाणे ।।२।।
ब्रह्म होता नये, हातीं मेघःश्याम । भर्जीं, सगुण ब्रह्मप्राप्ति ।।३।।
ज्ञानेशजाकान्त आम्हा सांगे गुज । ब्रह्माची सहज प्रतिष्ठा मी ।।४।।
(१४३)
सुवर्ण पहाया आवड मानसीं । तरी ते खोटीसीं घेणें पडे ।।१।।
वांचुनिया खोटी सुवर्ण प्रतीति । लटिकी निगुती जाणावी कीं ।।२।।
तेविं ब्रह्मप्राप्ति सगुणावांचुनि ।
अनुभवपणीं लटकीच ।।३।।
ज्ञानेशजा माय म्हणे उद्धवासी । जाऊनी गुरुसी विचारी पां ।।४।।
(१४४)
म्हणोनी उद्धवा तुझा उपदेश । विरहव्यथेस वाढवितो ।।१।।
नोहे हा सगुण मायाकार्यबुंधी ।
निमित्त निश्चिती माया येथ ।।२।।
लीलेनेंच धरी सगुण आकारु ।
नसतां विकारु मायागुणीं ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या सांगे उद्धवासी । मेल्याहि आशेसी सोडवेना ।।४।।
(१४५)
केव्हां होवोनियां यशोदा सुंदरी । उद्धवा मंदिरीं नेत असे ।।१।।
नवनीत चोरी करितो म्हणूनी । सखा चक्रपाणि बांधिला म्यां ।।२।।
म्हणोनियां गेला रुसोनी सांवळा । विरह उमाळा साहवेना ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या दह्यादुधांकडे । पाहोनियां रडे अट्टाहासे ।।४।।
(१४६)
जेथें जेथें हरी उद्धवा खेळत । तेथे जातां होत शूळ पोटीं ।।१।।
एका कृष्णायोगें एवढें हें गृह । भरले सावेव भासतसे ।।२।।
आतां आम्हां दोघा खाया ते धांवत । गेला कृष्णनाथ जैं पासूनी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या धाव मोकलूनि । गुण आठवोनी रडतसे ।।४।।
(१४७)
जेणें जेणें भावें हरिसी भाविती । गोपिका निगुती प्रेमभरें ।।१।।
त्याचि त्याचि भावें भावोनी श्रीकृष्णा । गोपीप्रेमखुणा दावितसे ।।२।।
पाहता तो गोपी प्रेमाचा उमाळा । विरह-उबाळा सर्वांलागी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याप्रेम विलोकितां । पाषाण तत्वता पाझरती ।।४।।
(१४८)
ऐसा हा सोहळा विलोकितां दृष्टीं । आंगीं भावपुष्टि क्षणोक्षणीं ।।१।।
आपण होवोनी सेविता विषय । तेथ रमाधव काय करी ।।२।।
प्रेमाचिया भरें व्याकुळ होवोनी । जंव न रंगोनी जाय प्रेमीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या तोवरी प्रारब्ध । भोगवित मुग्ध राहोनिया ।।४।।

विरह-व्यथा

(१४९) परतोनी जाणें
असो पूर्वपापें पातला समय । परतोनी होय जाणें ग्रामीं ।।१।।
कुटुंबपोषणभार निजमाथा । सेवा जया अर्था स्वीकारिली ।।२।।
सर्व अभिमान वियोग साधिती । नसे अनुभूति तये काळीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये अहंकार चिरा । करीत वागुरा सर्व सुखा ।।४।।
(१५०)
जंव नोहे दृढ ज्ञानेशजीं मति । सवे तों राहती सोमबंधु ।।१।।
सखा अत्रिसूत विचारी मानसीं । येतोंत कृपेसी असो द्यावे ।।२।।
ठाव असोनियां म्हणतसे माता । कोण कोण ताता जाता तुम्ही ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सुत परिचय । स्वामी दत्तात्रेय करविती ।।४।।
(१५१)
रडलियाविण कडे उचलोनी । कोणती जननी घेत सुता ।।१।।
विषयाचे संगें खेळतां पाहोनी । माता डावलोनी जाय तया ।।२।।
दुधाचिया मिषें रिघतां बालक । न करी उपरख स्तन्यालागीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या नसतांहि क्षुधा । मुखीं स्तन्य मुधा न घालीच ।।४।।
(१५२)

बहुता दिसानें वियाली वांझोटी । होता पुत्रतुटी जैसे होय ।।१।।
चुकले मागुती भेटले वासरुं । नेती वाटसरु धरुनियां ।।२।।
प्रेमाचिया वशें क्रोध उचंबळे । न जाय साहले जन्यदुःख ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सुताची आवडी । म्हणोनी सावडी नाना तनु ।।४।।
(१५३)
मागतां निरोप पुत्रप्रेमवशें । बोलत कां असे उताविळ ।।१।।
राहावे आणीक एकादिये दिन । करावे गमन सुखें मग ।।२।।
अनुसूयासूत दावित प्रकारु । मायिक श्रीगुरू नाहीं ऐसे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या प्रेमचि गोठले । वाटें मुसे आले देहाचिया ।।३।।
(१५४)
अत्रिसूत म्हणे प्रभो महाराजा । रथादिक ओजा सिद्ध सर्व ।।१।।
आतां राहिलिया होय विपरीत । दंडचि निश्चित देणें पडे ।।२।।
तरी गुरूरायें द्यावाचि निरोप । ऐकतां संतप्त स्वयें होती ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या सूताचिये मनीं ।
विषय डाकिणी साहेचिना ।।४।।
(१५५)
माझें वीर्य बळ असोनिया यासी । कळंक कुळासी लावितो हा ।।१।।
निर्मल निःसंग सुखी माझे कुळ । कैसा हा चांडाळ पोटीं आला ।।२।।
सांडिला यथानें स्वकुलाभिमान । जाहलासे दीन परासंगे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पुत्राचिया हितीं । तिळतिळ चित्तीं तुटतसे ।।४।।
(१५६)
तेव्हां बोले रोषें कासया मागता । आज्ञा व्हा चालता येथूनिया ।।१।।
लटिकाचि प्रेम लटिकाचि अर्थ । नये परमार्थ हाता येणें ।।२।।
द्यावा लागे बापा आत्मपिंड आधीं । नातरी उपाधि वाऊगीच ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यासुत ऐकोनियां । अभिषेकी पायां अश्रुजळें ।।४।।
(१५७)
म्हणे स्वामी सर्वांपरी हीन दीन । जाणोनी शरण आलों तुज ।।१।।
ऐकियेलें कानीं पतितपावन । पतित मी जाण महादोषी ।।२।।
हरिणी मोकली पाडसालागुनी । कोण वो अवनीं तारी त्यासी ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तुझा भरंवसा । रविसुत फांसा निवारी कां ।।४।।
(१५८)
विषयाचे संगें सर्वथा नाडोनी । नाना दुःखश्रेणी भोगितसे ।।१।।
कवणिया पुण्यें लाधले हे पाय ।
चुकवी अपाय मायबापा ।।२।।
नको माझे पाहूं गुणदोष कांहीं । सखे मायबाई साजणीये ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये उबार जाणोनी । राहो दे चरणीं आपुलिया ।।४।।
(१५९)
पाहोनी मातेचे सरोषवदन । आला तैं दाटून कंठ दुःखें ।।१।।

वाचा पांगुळली करवेना गोठ । कापूं लागे ओठ थरथरा ।।२।।
धरवेना धीर कोसळले रडे ।
लज्जेचे बिरडे सुटोनियां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या स्तनीं फुटे पान्हा । पाहोनिया तान्हा ओसंगा घे ।।४।।
(१६०)
नवनीत विरे तापकसंयोगें । परी काळ लागे थोडा बहु ।।१।।
कापुराचे आंगीं अति मृदुलता । घेत कठीणता संघट्टणें ।।२।।
माउ लीचे चित्त यापरीस मृदु । तेथहि संबंधु स्वसुखाचा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्याचित्त हळुवार । न साहे उशीर निमेषाचा ।।४।।
(१६१)
म्हणे बाळा कांहीं नको करुं खंती ।
जननी निश्चिती 'मी रे' तुझी ।।१।।
नको पडो देऊं पायाचा विसर ।
ध्यायी निरंतर ज्ञानराजा ।।२।।
आम्ही निरंतर पुत्राचे भुकेले ।
एकले दुकले व्हावे म्हूण ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पुत्रसुखें सुखी ।
नसे दुजी उखी कांहीं मनीं ।।४।।
(१६२)
मांडिये घेऊनी दिधला प्रसाद । सांडी म्हणे खेद मानसीचा ।।१।।
आजिचिये दिनीं राहोनियां जावे । सकळीं करावे कूच उद्यां ।।१।।
संबोधुनि सर्वां प्रेमळ उत्तरें । राहविले सारे तिये दिनीं ।।३।।
मंगळ मंगळ सुदीन तो जाणा । ज्ञानेश्वरकन्या अंगीकारी ।।४।।
(१६३)
आठवितां सुख जीव कासाविस । वाटे माहेरास देखेन कैं ।।१।।
तिळतिळ प्राण तुटतो साजणी । पाहे दीनवाणी निरोपासी ।।२।।
सोसवेना मज विरहाची व्यथा । माहेराच्या पथाकडे दृष्टि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सखये साजणी । कीति विनवणी करुं सांग ।।४।।
(१६४)
दुजे दिनीं सर्व निघालो तेथूनी । निज निज ग्रामीं जावयाते ।।१।।
वडिल भ्राताहि राजसेवारत । करी बहु प्रीत मजवरी ।।२।।
तयालागीं वाटे यावे मजपाशीं । धाडी लिखितासी येणें रीति ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तयाही पदरीं । धरावे अंतरीं होते वाटे ।।४।।
(१६५)
आज्ञा परिसूनी केली तैं व्यवस्था । धाडिले लिखिता तयेरीति ।।१।।
मानसीं हरिख पावुनिया भारी । आले शेषपुरी बंधुराय ।।२।।
दोघे मिळोनिया राहो तये स्थानीं । सुख समाधानी करोनिया ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये सुत आठवण । आलीसे म्हणून धांवत ये ।।४।।

(१६६)
आयिकिलें कानीं माझी माय आली । उतावीळ झाली पहावया ।।१।।
बंधु तव गेले निज व्यवसाया । मज तंव ठाया न सोडवे ।।२।।
वरिष्ठाधिकाऱ्या धाडिलें लिहून । आजिचिये दिनीं नये कामीं ।।३।।
ज्ञानेशजा पाय पाहिल्यावांचोनि । समाधान मनीं न वाटेचि ।।४।।
(१६७)
भोजनादि सर्व सारोनी निघालो । पाहता निवालों पाय डोळा ।।१।।
निघाली माताहि श्रीनिवासभेटी । करिती शेवटी तेथें वासू ।।२।।
एक दोन दिन राहोनिया तेथें । म्हणती आम्हाते द्यावे गृह ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पुत्राकरीं सेवा । घ्यावी मनोभावा ऐसें आले ।।४।।
(१६८)
म्हणती आम्हासी द्यावे एक गृह । राहूं सर्वांसह कांहीं दिन ।।१।।
आम्ही एकेठायीं होतो तिघेजण । दोघे बंधु जाण आणि दत्त ।।२।।
दत्त म्हणे माते राही आम्हा घरीं । संकोच न धरी मायबापा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये तुझे तुज देता । अभिमान वृथा आम्हां वाटे ।।४।।
(१६९)
विनंति मानोनी आले रहिवासा । आनंद मानसा थोर वाटे ।।१।।
पुढें ताईलागीं बोलाविले तेथें । भोजनव्यवस्थे लागोनिया ।।२।।
वक्षस्थळीं लक्ष्मी पाहोनिया रोषें । गंगा निघतसे चरणाहूनि ।।३।।
निघाली हरीच्या चरणापासूनी । ठेविली मूर्धौनी सदाशिवे ।।४।।
परी तेथे होती पार्वती सवती । निर्मत्सरस्थिती कोठें नाहीं ।।५।।
अनंत गोपिका निर्मत्सरचित्तें । सेविती हरीते प्रेमभावें ।।६।।
घ्यावयालागीं वृत्तीचें शिक्षण । आलीसे धांवून भागीरथी ।।७।।
ज्ञानेश्वरकन्या पायीं जिचें मन । गंगाजल पूर्ण शुद्ध जैसे ।।८।।
(१७०)
रमेसम घरीं जिचीये पायिका । अंगीकारी रुका प्रेमें माझा ।।१।।
भोगींद्रावरी जो करीत शयन । घेत पांघरुण दरिद्र्याचे ।।२।।
जयापाशीं सिद्ध अमृत कोठारे । कदाह्नहि बरें सेवितसे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणे ज्या आपुले । त्याचे घेसुकलें पान प्रेमें ।।४।।
(१७१)
सज्जनाची रीति वाचे जे बोलावे । लोकातें दावावें आचरोनी ।।१।।
भल्याही पुरुषें लाळिली इंद्रियें । तरी हानि होये विवेकासी ।।२।।
म्हणोनिया भोग जरी प्राप्त दैवें । परी चित्त व्हावें विरागीच ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या सांडोनी वैकुंठा वसवी भूपेठ याचि हेतु ।।४।।
(१७२)
काय दीपप्रभा सांडील दीपासी । सोडील वृक्षासी छाया कधीं ।।१।।
केविं ये काढता कापुराचा गंध । गुळाचा कैं बांध सांडी गोडी ।।२।।
तैसा भक्तासाठीं येता नारायण । ऐश्वर्य ये जाण तयासंगे ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या जेथ जेथ जाये । तेथें तेथें आहे सर्वपूर्ति ।।४।।
(१७३)
भोगीहि विराग दावावयासाठीं । करी नाना गोठी लीलामात्र ।।१।।
षड्रस पक्वान्न वोपियेले ताटीं । त्यागोनियां उठी कोपयुक्त ।।२।।
सांडोनियां मऊ पलंग बिछाना । भूमि अंग जाणा निक्षेपित ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यें सुखदुःख सम । स्वयें आत्माराम म्हणोनियां ।।४।।
(१७४)
यश श्री औदार्य आणखी विराग । ज्ञानैश्वर्य भग सहा जाणा ।।१।।
ऐसे षडभग जैसे देवा आंगीं । तैसे भक्तालागीं प्राप्त होती ।।२।।
देवपणीं देवा यांचा अभिमान । भक्त ते याहून अलिप्तचि ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या कैसी ययाहून । राहे निरभिमान तेचि सांगो ।।४।।
(१७५)
दिगंतीं दाटला कीर्ति जयघोष । बाल्यीं वरी यास सर्वज्ञता ।।१।।
न करितां कांहीं विजयसायास । संपादिले यश गुरूराये ।।२।।
श्रीयेचा जो पति वश केला तिहीं । म्हणोनिया श्रीहि न सोडी त्या ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या उदाराचा दाता । आपुली योग्यता याचका दे ।।४।।
(१७६)
शिक्षणरहित बाल्याचिपासूनी । सर्वशास्त्रज्ञानी गमला जो ।।१।।
सर्वही सिद्धींचा दाता भगवान । वचना अधीन जयाचिया ।।२।।
तयाचे ऐश्वर्य काय मी वर्णौवें । परी नाहीं गर्वे झाकुळला ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या षड्भगसंपन्न । विरागें त्याहून अलिप्तचि ।।४।।
(१७७)
स्वयें योगियानें ऐसेचि वागावें । जनीं अवमानावे तयालागीं ।।१।।
म्हणोनियां निज हस्तें अपमान । कोण्या मिषें जाण करोनी घे ।।२।।
ओसणता ज्याची मनोरथ पूर्ति । तोचि दुज्याप्रति अन्न मागे ।।३।।
बृहस्पतिपाडे सर्वज्ञता जोडे । परी स्वयें दडे वेडिवेंत ।।४।।
ज्ञानेशजा माय उदार असोनी । सकामालागीं थारा नेदी ।।५।।
(१७८)
असे सर्वशक्ति सर्वशास्त्रयोनि । परी वागे जनीं बाळासम ।।१।।
विरागें जो माथा डोलवी शुकाचा । लोकीं दिसे साचा सक्त जेविं ।।२।।
अष्टसिद्धि दासी ऐसी ज्याची थोरी । तोही लोकाचारी वर्ततसे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या लक्षणारहित । साधी लोकहित गुणाश्रयें ।।४।।
(१७९)
देवातें जाणीव निज ऐश्वर्यौंची । निज ब्रह्मत्वाची राहे तैसी ।।१।।
जो न निवटत जाणिवाभिमान । समरसपूर्ण तंव नोहे ।।२।।
भक्तिमाजीं विरे सारा अभिमान । देवचि म्हणून भक्त होय ।।३।।
ज्ञानेश्वरप्रभु ज्ञानेशजा तात । देवो झाला भक्त वदताती ।।४।।
(१८०)

सर्व अहंकार मायिक साचार । ब्रह्म निर्विकार एकरुप ।।१।।
अज्ञानी मी देह ज्ञानी अहंब्रह्म । परी आत्माराम वेगळाचि ।।२।।
शिष्या ब्रह्मरुप करणें गुरुसी । नेदी अहंकारासी स्पर्शो कोण्या ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या शिक्षणाची रीति । बोलतो निगुती श्रवण दचा ।।४।।
(१८१)
रजस्तमवृत्ति आटती सत्वांत । मग उर्वरित सत्व राहे ।।१।।
रजतमनाशीं सत्वाची आवडी । सत्वीं देतां बुडी दोघे येती ।।२।।
रजतमसत्व अन्योन्य मिथुन । म्हणोनी करण सत्वनाशू ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या तेचि साधवया । करीत उपाया नानापरी ।।४।।
(१८२)
रजस्तमयोगीं देहाहंता वाढे । मोडे तिचे गाडे सत्वामाजीं ।।१।।
सत्वहि वाढतां थोरीवेचा माज ।। जाणीव सहज बांधतसे ।।२।।
जाणीवाहंकार सांडुनि धाकुटे । होताचि निवटे सत्वबाधा ।।३।।
ज्ञानेश्वरकन्यापायीं नित्य दीन । एकचि सोपान ब्रह्मीं याया ।।४।।
(१८३)
देहाहंतेंविषीं असलिया दीन । वैराग्य ते जाण अपर कीं ।।१।।
देहाहंता माझी विराली निःशेष । वाटे माज ज्यास जाणिवेचा ।।२।।
याहि जाणिवेचा वाटे ज्याते शीण । त्याचा पर जाण विराग तो ।।३।।
ज्ञानेशजापायीं समर्पो जाणीव । मग ब्रह्मभाव वरा सुखें ।।४।।
(१८४)
याचे नांव भक्ति म्हणो आम्ही जाण । चित्त सदा लीन गुरूपायीं ।।१।।
आपुल्या बाळाची ऐसी वृत्ति लीन । व्हावया विंदान करी नाना ।।२।।
ठावे मायबापा अल्पशक्ति जीव । धरी अहंभाव वाऊगाची ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या पाहोनी दीनता । गुणदोष चित्ता नाणी मग ।।४।।
(१८५)
सेवें देहाहंता गळत निःशेष । अर्पिल्या गुरुस देहभाव ।।१।।
गुरुसेवे जो कां झिजवी शरीर । नाहीं अणुमात्र शरीराशा ।।२।।
नाहीं जीवीं खंती शुष्क झाल्या देह । गुरुपायीं स्नेह देहाहूनि ।।३।।
गुरुसेवे कृश गुरुप्रेमें पुष्ट । तयावरी तुष्ट ज्ञानेशजा ।।४।।
(१८६)
सेवें देहाहंता प्रेमे जीवाहंता । गळाल्या ब्रह्मता स्वतःसिद्ध ।।१।।
झणीं वाटे शिष्यचित्ता सेवेविण । अवसर क्षण देता मिया ।।२।।
वासना संस्कार आकळेल चित्ता । वाजे देहाहंता तयाठायीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या नेदीच सवड । वासना काबाड चिंतावया ।।४।।
(१८७)
माते जो कां पैका मिळे वेतनाचा । स्वामी सेवे साचा लावी प्रेमें ।।१।।
बंधुहि तैं प्रेमें आपुलें वेतन । स्वामीकार्यो जाण देऊं लागे ।।२।।
वडिलासी कांहीं त्यांतुनि न दिले । हेंचि कार्य भले जाणोनियां ।।३।।

ज्ञानेश्वरकन्या मंडळीतें म्हणे । घरोघरीं जाणे भोजनासी ।।४।।
(१८८)
जंव बाळपण तंव मूढावस्था । विचारपात्रता तंव नाहीं ।।१।।
म्हणोनियां बाळ रडतांचिक्षणीं । माता स्तनपानीं समजावी ।।२।।
तैसें जीवाठायीं विकार प्राबल्य । विकारा आश्रय देहबुद्धि ।।३।।
अल्प देहा त्रास होता ये विकार । तेणें दृढतर देहबुद्धि ।।४।।
देहविकाराचा निकट संबंध । एका होता बाध दुजा शमे ।।५।।
जाणितले चित्तीं माझ्या मायबापें । प्रेमतरु वापे ऐसे कीजे ।।६।।
जरी माझा आणि मंडळीचा भार । टाकूं शिरावर यांचिया मी ।।७।।
ज्ञानेशजा म्हणे होईल या त्रास । तेणें मग ऱ्हास प्रेमाचाची ।।८।।
(१८९)
ऐसे चिंतोनिया म्हणे इतरासी । जावे भोजनासी दुज्या घरीं ।।१।।
ताई करोनिया देवाचा नैवेद्य । येथेंचि प्रसाद घेईल ती ।।२।।
ऐसा नित्य होता मंगळ सोहळा । नेणो आले फळा कोण पुण्य ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या तृप्त झाल्यावरी । शेष प्रेमभरी सेवितसो ।।४।।
(१९०)
बाळें हठ घेतां मुखीं स्तन । नातरी मोठ्यान आक्रंदी ते ।।१।।
तयाचे पाहोनी थोर करी हठ । तरी त्या थापट देत माता ।।२।।
कुक्षींगत बाळ माते मारी लाथा । तरी क्र ोध चित्ता शिवेचिना ।।३।।
म्हणोनियां थोर जरी मारुं धावे । तरी काय जीवे साहवेल ।।४।।
ज्ञानेशजा माय शिशूतें पाळीत । दंडें सांभाळीत थोरालागीं ।।५।।
(१९१)
मजहूनि थोर आथी सर्वजण । साक्ष श्रीचरण येविषयीं ।।१।।
परी तुझ्या मातेलागीं मी मारिते । म्हणता शिशूतें सत्य वाटे ।।२।।
लागलीया माता लीलेची रडाया । बाळ मारतियां मारुं धांवे ।।३।।
ज्ञानेशजेसवे इतरांची लीला । तोचि आम्हा आला प्रेम हेतु ।।४।।
(१९२)
शिशूचा घेऊनी निज हातीं हात । लिहवी पंडित वर्ण जैसे ।।१।।
बोबडिया बोले जनक जननी । शिकविती वाणी बाळालागीं ।।२।।
तेविचि समर्थीं मज शिकवण । दाखाया लीला जाण केली ऐसी ।।३।।
ज्ञानेशजामाय नाना लीलायोगें । परमार्थीचीं सोंगें दावी मज ।।४।।
(१९३)
महाराजापायीं इतरांचा प्रेम । असे श्रेष्ठतम मजहूनि ।।१।।
नाहीं मी काढीत त्यांचे गुणदोष । नाहीं उणें त्यास मजपाशीं ।।२।।
परी त्यांचे ठायीं माझ्या विकाराचे । पडले जे साचे प्रतिबंध ।।३।।
तया आभासाचा करोनी निर्देश । करी उपदेश निजमना ।।४।।
ज्ञानेश्वरकन्ये राहोनि हृदयीं । नये कधीं देहीं ऐसे करी ।।५।।
(१९४)

माझे चित्तीं नाना उठले विकार । बोलिलो कठोर मायबापा ।।१।।
उपदेश बीज पेरिता ये ठायीं । फळभारें कहीं फोंफावेना ।।२।।
ऐसे जाणोनियां केला माझा त्याग । केलियाचा भोग चुके केंवि ।।३।।
पुढें मायबापा येऊनी करूणा । दाविल चरणा विश्वास हा ।।४।।
ज्ञानेश्वरकन्ये तेव्हां हे विकार । न उठो साचार मनीं माझ्या ।।५।।
(१९५)
सर्व घातमूळ वासना जंजाल । भोगवी सकळ सुखःदुख ।।१।।
ययाचा कराया समूळ विनाश । निरोध सायास कामा नये ।।२।।
विषयाची आशा राहोनिया चित्तीं । रोधितां प्रवृत्ति कष्टमात्र ।।३।।
ज्ञानेशजे तुझ्या एका प्रेमाविण । वासना डाकीण मरेचिना ।।४।।
(१९६)
गुरूदेव यांचे पायीं मनोवृत्ति । संतत निश्चिती वाहो लागे ।।१।।
तया दशे भक्ति म्हणतातो मुनि । श्रीकृष्णकामिनी उपदेशू ।।२।।
पर्जन्याची धारा अनन्य भूमीसी । का गंगा गीवसी समुद्राते ।।३।।
तैसे निज शिष्या अनन्यगतिक । करावया शीक देती गुरू ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणे ऐसी वृत्ति । थारे तेचि रीति करुं आतां ।।५।।
(१९७)
पतिसुखासाठीं जीव कासाविस । तरीच प्रेमास अखंडता ।।१।।
मित्राचिया हिता रात्रंदिन जागा । तरी तया दोघा अखंडत्व ।।२।।
पुत्राच्या कल्याणा जपती सर्वदा । अभंगता तदा तया प्रेमीं ।।३।।
ज्ञानेशजासूत जीव न घाबरा । तरी प्रेमझरा सुके म्हणे ।।४।।
(१९८)
सुखी आहे माझा स्वामी ऐसी वृति । समाधान चित्तीं वाढवीत ।।१।।
सुखी राहो स्वामी ऐसी वृत्ति जाणा । पोषक करुणारसा लागीं ।।२।।
करुणारसाचा नाहीं जो उद्भव । वासनंचा तव नाश नोहे ।।३।।
ज्ञानेशजा सांगे स्वामी सुखासाठीं । नित्य व्हावे पोटीं कासावीस ।।४।।
(१९९)
स्वामीचिये ठायीं सुख समाधान । पाहतांचि क्षीण वृत्ति होय ।।१।।
मग चित्त धावें विषयाचे पाठीं । सांडुनी गोमटी गुरूमूर्ति ।।२।।
तेचि जरी वाटे स्वामी माझा कष्टी । अनिवार पोटीं दुःख होय ।।३।।
ज्ञानेशजा सांगें तेणें सहजचि । विस्मृति देहाची पडे जाणा ।।४।।
(२००)
निजठायीं दुःख प्रतीति दावुनी । घ्याव्या आकर्षोनी चित्तवृत्ति ।।१।।
ऐसा करोनियां मनीं सुविचार । करी शोक फार मृत स्त्रीचा ।।२।।
सांडी अन्नपाणी तैसा व्यवहार । व्याकुल अंतर स्त्रियेलागीं ।।३।।
ज्ञानेशजा दुःखी पराचिया हिता । एरी दुःखवार्तौ तेथें कैंची ।।४।।
(२०१)
कुटील अंतरीं करिती कल्पना । वृथा ही वल्गना म्हणोनिया ।।१।।

साच नसे दुःख तरी कां वैकल्य । परी प्रश्न होय ऐसा येथें ।।२।।
दृष्टान्तचि नाहीं म्हणोनी आशंका । व्यक्ति द्वेषें देखा न माना कीं ।।३।।
ज्ञानेशजासुत म्हणे आद्य मिथ्या । द्वितीयीं सर्वथा बोलूं नेच्छि ।।४।।
(२०२)
काय परदुःखें नोहे दुःखी कोणी । म्हणोनियां मनीं आशंका ये ।।१।।
बाळाच्या कल्याणा शिक्षा करी माता । परी व्याकुलता दुज्या क्षणीं ।।२।।
तैसें चित्तीं तिचे धरूनी कल्याण । केलें जें ताडन स्त्रिये लागीं ।।३।।
त्याचियोगें ज्ञानेशजा करी दुःख । जया दुःखीं सुख आन नाहीं ।।४।।
(२०३)
ऐसा अहेतुक दासहित करी । कोण ऊर्वीवरी गुरुविण ।।१।।
जाणोनिया मनीं करूणाकल्लोळीं । दचावा निजबळी शिष्यराये ।।२।।
हाचि अनुपदीं दुःख करोनिया । बोध गुरूराया देणें लागे ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या सूतांची वासना । नाशाया विंदाना करीतसे ।।४।।
(२०४)
एकादीये वेळीं नेघे अन्नपाणी । दिवस यामिनी शोक करी ।।१।।
नाहीं संभाषण नाहीं ज्ञानचर्चौ । ज्ञानराजअर्चौ मध्यरात्रीं ।।२।।
शौचस्नानादिक विधीचें पालन । नोहे कधीं जाण नियमाने ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या जे जे करी कर्म । मानी आत्माराम निजपूजा ।।४।।
(२०५)
मनीं वाटे तरी एकादीये वेळे । अहोरात्र खेळी घालवित ।।१।।
किंवा बोधमंदाकिनी जलभारें । संसृति तणारे वाहवीतु ।।२।।
तेचि बोधगंगा सुक्तिरत्नावली । रुपें प्रगटिली आम्हालागीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये निजसुतचिंता । नानापरी हिता योजितसे ।।४।।
(२०६)
बोधें भंगोनिया आवृत्ति जागवी । आनंदें लोपवी विक्षेपाते ।।१।।
जंव नोहे पूर्ण विक्षेपाचा लय । तंव लक्ष्य होय परोक्षचि ।।२।।
विक्षेप निमाल्या प्रगटे समाधी । तदाकार बुद्धी लक्ष्यरुप ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या विक्षेप नाशाया । करीत उपाया नानापरी ।।४।।
(२०७)
विषयसंयोगें वाटे समाधान । वियोगानें शीण होय भारी ।।१।।
या नांव विक्षेप म्हणताती मुनी । आत्मसत्ते आणी हाचि भेद ।।२।।
व्यापकसत्तेचा शब्द करी बोध । विषयसंबंध विक्षेपानें ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या विचारी मानसीं । कैसे विक्षेपासी घालवावे ।।४।।
(२०८)
सुचला उपाय म्हणे सुखदुःख । विषयानें देख होती जीवा ।।१।।
जंववरी आहे जवळीं विषय । तंववरी होय सुख यया ।।२।।
तोचि दुरी गेल्या सांडुनी यायासी । तरी वृत्ति पिसी तयासाठी ।।३।।
तरी आतां ऐसे करुं आचरण । जंव माझा पूर्ण संग आहे ।।४।।

तंववरी यया वाटावा आनंद । वियोग दुःखद व्हावा तैसा ।।५।।
ज्ञानेश्वरकन्या म्हणोनिया आधीं । प्रेमें नानाछंदी रंजवीत ।।६।।
(२०९)
तेणे सुताआंगीं चढे प्रेमपुष्टि । क्षणभरी तुटी साहवेना ।।१।।
सहज विषयीं पडत विस्मृति । सदा गुरूमूर्ति चित्तीं नांदे ।।२।।
संयोग सुखाचें हें एक लक्षण । अनुभव पूर्ण याचा सर्वौ ।।३।।
ज्ञानेशजासुत म्हणे ऐकें सुख । होता मन देख दुजा इच्छी ।।४।।
(२१०)
भोजनानें तृप्ती होता रतिसुखा । इच्छी मग देखा द्रव्य मनीं ।।१।।
द्रव्य लाधलिया पुत्राचिया आशे । जागवी सायासे देवोदेवी ।।२।।
ऐसा एक संग सांडुनिया दुजा । इच्छित सहजा मनामाजीं ।।३।।
ज्ञानेश्वरकन्ये निजसंगगोडी । दृढचित्तबेडी करणें होते ।।४।।
(२११)
निजपदासक्ति राहावी अखंड । विषयाचें बंड हारपोनी ।।१।।
तयासाठीं व्हावा पदीं चित्तावेश । नोहे ज्याचा नाश विषयानें ।।२।।
जरी माझा संग विषयासारखा । वाटे तरी देखा नोहे सिद्धि ।।३।।
ज्ञानेशजा म्हणे मजसी सोडुनी । पुत्रादि कामिनी इच्छिल हा ।।४।।
(२१२)
गुरुपादोदधीं चित्त मंदाकिनी । अतृप्त होवोनि वाओ लागे ।।१।।
तरी मग नोहे विषयाची स्मृति । विक्षेपाची स्थिती नाशे तेणें ।।२।।
म्हणोनिया माझ्या संयोगेहि तृप्त । होतां विषयांत पडेलचि ।।३।।
ज्ञानेशजा म्हणे संयोगलालसा । वारील वळसा विषयाचा ।।४।।
(२१३)
प्रथम संयोगीं वाढविला प्रेम । विषयाचा काम निवाराया ।।१।।
यथालागीं जाणा म्हणती रक्षण । परी जेव्हां मन प्रेमीं तृप्त ।।२।।
तरी मन इच्छी सांडिला विषय । तेणें तृप्ति होय घातकचि ।।३।।
गुरूसंयोगानें वाढविला प्रेम । निजसुख काम तेथें जरी ।।४।।
ज्ञानेशजा सांगे तरी तो अखंड । नोहे रिपुबंड निवारक ।।५।।
(२१४)
जरी योगीं नित्य राहे प्रतिबंध । तरी मन छंद नेघे प्रेमीं ।।१।।
जरी योगीं नित्य पाहे निजसुख । विषयाभिलाख न सुटेचि ।।२।।
म्हणोनी सुटावा विषयाचा संग । गुरू अनुराग नित्य व्हावा ।।३।।
हेंचि साधावया करणें वर्तन । रक्षण शिक्षण नांव याचे ।।४।।
ज्ञानेश्वरकन्या प्रेम कडसणी । उकल करोनी तेही सांगो ।।५।।
(२१५)
प्रेमीं होय दुःख असे दोप्रकारीं । एक ऱ्हास करी दुजे वृद्धि ।।१।।
जेणे निजसुखीं वाटे अंतराय । प्रथम तें होय दुःख जाणा ।।२।।
दुज्यामाजीं वाटे आपुल्या जीवलगा । नसो सुख भोगामाजीं उणें ।।३।।

स्कंददास म्हणे प्रथमीं प्रेमाचा । ऱ्हास वृद्धि साचा दुजें करी ।।४।।
(२१६)
कान्ता मनोभावें वागे जो पतीसी । तोवरी चित्तासी आल्हाद दे ।।१।।
व्यभिचारी होतां मन होय दुःखी । प्रेम तिच्या विखीं उणा तैसा ।।२।।
सद्‌गुणी सुंदर असो निज सुत । न साहवे लाथ हाणी जरी ।।३।।
स्कंददास म्हणे भोगीं अंतराय । झाला तो अपाय प्रेमामाजीं ।।४।।
(२१७)
पतीविण नाहीं आणीक दैवत । सेवेलागीं देत मनोभाव ।।१।।
पति दुःखशंका आलिया मनांत । कळवळे चित्त प्रेमभरें ।।२।।
निजसुख आशा सांडिली सर्वथा । काया वाचा चित्ता पति सेवी ।।३।।
पतिसुखापुढें विसरी निजसुख । तया नव्हे दुःख ऐसे करी ।।४।।
स्कंददास म्हणे प्रेमाची मीमांसा । दाविली वळसा दाखाया मना ।।५।।
(२१८)
दुजा दुःख देई ऐसे आधीं वाटे । दुजियांत वाटे कारण मी ।।१।।
सर्व प्रतिबंधा निजकारणता । नित्य विलोकिता प्रेमवृद्धि ।।२।।
ऐसा बोध जेणें ठसवी श्रीगुरू । शिक्षण प्रकारु जाणा तोचि ।।३।।
ज्ञानेशजासूत म्हणे गुरूकृपें । निरोपूं साक्षेपें तेहि पुढें ।।४।।
(२१९)
शिक्षणप्रकारें बाणे जया चित्तीं । प्रेमपूर्ण स्थीति श्रीगुरू तो ।।१।।
मग तयालागीं देवोनी स्वातंत्र्य । जगाचा उद्धार करविती ।।२।।
इया दशेमाजीं हेंचि वाटे मनीं । श्रीगुरूजननी कष्टविली ।।३।।
माझियाचि हिता अनंत उपाधी । कल्पोनी स्वछंदीं लावियेले ।।४।।
आतां कोण माझ्या आवरील मना । विषयवासना केविं राहे ।।५।।
स्कंददास म्हणे ऐसिया प्रकारें । विरहें पाझरे प्रेमगंगा ।।६।।
(२२०)
गुरू होवोनिया श्रीगुरू चिंतन । संयोगीं लालन वियोगाचे ।।१।।
अनिर्वाच्यस्थीति न वर्णवे वाचे । मौन हे मौनाचे स्वसंवेद्य ।।२।।
येथे प्रतिबंध कल्पितचि सर्व । प्रतिबंधाभाव तापक तो ।।३।।
ज्ञानेशजे देई विपत्तीच्या कोटी । जेणें तुझें पोटीं कळवळा ।।४।।
(२२१)
स्वातंत्र्याचे दुःख साहोनिया पोटीं । झाला दीनासाठीं साकार जो ।।१।।
सोडोनी समाधी साहे जनाघात । उपाधी निवृत्त होवोनियां ।।२।।
सर्व दुःखमूळ मानी जो मनासी । कासया जनासी दुःखवील ।।३।।
ज्ञानेशजा माय सर्वोपरी शुद्ध । नेणती अबुद्ध वर्म तिचे ।।४।।
(२२२)
जाणोनिया वागे पतिमनोगत । आवडे चित्तांत पत्नि ऐसी ।।१।।
माकडापर
ी तैं नाचे तिचे छंदें । लुब्ध केला नादें मृग जैसा ।।२।।

परी कोणे काळीं बोलता टाकोनी । न साहे तो मनीं बोल तिचे ।।३।।
तैसा जंव गुरू सांभाळी शिष्यासी । तंव त्या भक्तीसी पार नसे ।।४।।
स्कंददास म्हणे बोलतां कठोर । प्रेमांत अंतर पडो लागे ।।५।।
(२२३)
ययाचे कारण वृत्तीचा स्वभाव । अनुकूल ठेव नित्य पाहे ।।१।।
जेथें आनुकूल्य वाटेल तियेसी । संलग्न नेमेसी होय तेथें ।।२।।
निज गुणदोष न दिसती डोळा । लावी नित्य मळा दुज्या आंगीं ।।३।।
स्कंददास म्हणे दुःखाचें तें मूळ । स्वाधीन समूळ करुं इच्छी ।।४।।
(२२४)
कथानुसंधानीं सावधान श्रोता । श्रीगुरू असतां आम्हां घरीं ।।१।।
पूर्वी लीलागुणें वृत्तीचे कर्षण । करुनि रक्षण केला प्रेम ।।२।।
तोच आलियाही दुःखाचे पर्वत । न व्हावा खंडित म्हणोनियां ।।३।।
ज्ञानेश्वरकन्या दावोनिया दुःख । सांभाळीत देख प्रेमात्थानीं ।।४।।
(अपूर्ण)
○○○